महाराष्ट्र टाइम्स
वार, २४ मार्च २०१५ पुणे pune.mtonline.in | f www.face

# ऑनलाइन सातबारे एप्रिलपासून देणार

## जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत सुरुवात करणार

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सातबारा व फेरफार उतारे ऑनलाइन देण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेचे काम पूर्णत्वाला आले असून येत्या १ एप्रिलपासून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत ऑनलाइन सातबारे देण्यास सुरुवात करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. काही तालुक्यांत ऑनलाइन उतारे देण्याचे काम प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आले आहे.

पुणे शहर तहसील कार्यालयासह जिल्ह्यातील तेरा तालुक्यांत ऑनलाइन सातबारे उतारे देण्यासाठी पंधरा लाखांहून अधिक सातबारा कम्प्युटराइज्ड करण्यात आले आहेत. सातबारा उतारे व फेरफार नोंदी संगणकावर नोंदवून ते ऑनलाइन देण्यापूर्वी राज्य सरकारकडून त्याला संमती घ्यावी लागते. त्यासंदर्भातील सीडी राज्य सरकारला पाठविण्यात आल्या असून त्यास मान्यताही मिळाली आहे.

सातबारा उतारा व फेरफार मिळविण्यासाठी करावी लागणारी कसरत टाळण्यासाठी राष्ट्रीय भूमी आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत ऑनलाइन सातबाराची महत्त्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे. संपूर्ण राज्यात ही योजना राबविली जाणार आहे. पुणे जिल्ह्यात १ एप्रिलपासून ही योजना कार्यान्वित करण्याचा महसूल प्रशासनाचा प्रयत्न आहे. हवेली तालुक्यात सातबारा उताऱ्यांची संख्या सर्वाधिक असल्याने त्याच्या डाटा एन्ट्री करण्याचे काम अधिक काळ चालले आहे. हे कामही वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

या योजनेंतर्गतच दुय्यम निबंधकांच्या कार्यालयात खरेदीच्या दस्ताची नोंद झाल्यावर त्याची माहिती तातडीने तहसील कार्यालयांतील म्युटेशन सेलना मिळणार आहे. त्या माहितीवर लगोलग फेरफार उतारा तयार होणार आहे. फेरफार झाल्यानंतर पंधरा दिवसांत खरेदीदाराला सातबारा उतारा देण्यात येणार आहे. दस्तनोंदणीच्या वेळेस विकणारे आणि खरेदीदार दोघेही उपस्थित असतील, तर सातबारावरील नोंदीसाठी नोटीस काढण्यात येणार नाही. या खरेदीसंबंधी गावांत चावडीवर नोटीस लावण्यात येईल. त्यावर हरकत न आल्यास पंधरा दिवसांत सातबारा मिळणार आहे.

# प्रॉपर्टी कार्डही ऑनलाइन

## भूमी अभिलेख विभागाचा निर्णय

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सातबारा आणि फेरफार नोंदींपाठोपाठ प्रॉपर्टी कार्डसुद्धा ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाने घेतला असून त्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर) तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांतच प्रॉपर्टी कार्डही ऑनलाइन मिळू शकणार आहे.



राष्ट्रीय भूमी आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत ई-म्युटेशन ही महत्त्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून सातबारा ऑनलाइन देण्याची सुविधा लवकरच सुरू होत आहे. राज्यातील तीनशेहून अधिक तालुक्यांतील सातबारा संगणकीकरणाचे काम पूर्णत्वाला गेले आहे. पुणे शहरासह जिल्ह्यातील तेरा तालुक्यांत सातबारा संगणकीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. काही तालुक्यांत सातबारा ऑनलाइन देण्याचे कामही सुरू झाले आहे.

सातबारा ऑनलाइन देण्याच्या सुविधेचा थेट लाभ नागरिकांना होणार आहे. त्यापाठोपाठच आता प्रॉपर्टी कार्डसुद्धा ऑनलाइन देण्याची योजना भूमी अभिलेख विभागाने हाती घेतली आहे. पुण्याबरोबरच राज्यातील अनेक शहरांत प्रॉपर्टी कार्ड देण्यात येत आहे. तसेच, तीन हजारांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांच्या मोजणी करून प्रॉपर्टी कार्ड देण्याची महत्त्वाकांक्षी योजना राज्यात यापूर्वी सुरू करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यात तुळापूर व वढूला हे काम झाले आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील मोजणी न झालेले गाव निवडून प्रॉपर्टी कार्ड देण्याचे कामही भूमी अभिलेख खात्याकडून सुरू करण्यात आले आहे.

जमिनीच्या सातबारा उताऱ्याप्रमाणेच मालमत्तेचे प्रॉपर्टी कार्ड ऑनलाइन देणे ही काळाची गरज झाली आहे. त्यासाठी भूमी अभिलेख विभागाकडून पावले उचलण्यात येत असून त्यासाठीचे सॉफ्टवेअर तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.